# एनसीसी रिपोर्ट 2021- 22

## वृक्षारोपण

26 जुलै 2021 ला महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तर्फे वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे हे उपस्थित असून इतर सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी हे हजर होते. महाविद्यालयाच्या परिसरातच यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी पाच झाडे लावून हा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

## Tree plantation

On 26 July 2021, a tree plantation program was conducted by the NCC unit of the college. Dr. Subhash Gavhane, principal of the college was present for this program and all other faculty members and non-teaching staff were also present. On this occasion, tree plantation was done in the premises of the college itself. This event was celebrated by planting five trees.



# मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

28 ऑगस्ट 2021 रोजी 13 महाराष्ट्र बटालियन खामगाव यांच्या मार्गदर्शनातून महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तर्फे पाच किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे यांनी हिरवी झेंडी दाखवून तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून केले. व स्वतः या मॅरेथॉन मध्ये सहभागी सुद्धा झाले. या मॅरेथॉन स्पर्धेसाठी विशेष उपस्थिती म्हणून प्राध्यापक उल्हास ब्रम्हे हे लाभले असून या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटचे प्रमुख लेफ्टनंट शरद रावे यांनी केले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक हा सिद्धेश्वर गायकी याचा आला असून द्वितीय क्रमांक गजानन अस्वार व तृतीय क्रमांक एकनाथ सिनकर या विद्यार्थ्यांनी पटकावला. यासाठी त्यांना अनुक्रमे महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांच्यातर्फे 251 प्रथम बक्षीस 201 रुपया द्वितीय बक्षीस तर 151 रुपये तृतीय बक्षीस असे पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेसाठी एकूण 35 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

# Marathon Competition

On 28 August 2021, a five kilometer marathon competition was organized by the NCC unit of the college under the guidance of 13 Maharashtra Battalion Khamgaon. The competition was inaugurated by Dr. Subhash Gavane, principal of the college by showing the green flag and guiding the students. And also participated in this marathon. Professor Ulhas Bramhe has been graced as a special presence for this marathon competition and this program has been planned by the head of NCC unit of the college Lt. Sharad Rave. Siddheshwar Gaiki got the first place in this competition, Gajanan Aswar got the second place and Eknath Sinkar got the third place. For this, they were awarded Rs 251 for first prize, Rs 201 for second prize and Rs 151 for third prize respectively by the NCC officer of the college Lt Sharad Rave. A total of 35 students participated in this competition.






# स्वच्छता मोहीम

दिनांक 24 सप्टेंबर 2021 रोजी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तर्फे स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व स्वच्छतेचे महत्त्व समजून सांगितले. या मोहिमेसाठी एनसीसी युनिटच्या सर्वच कॅडेट्सने सहभाग नोंदवला होता. या मोहिमेचे नियोजन लेफ्टनंट शरद रावे यांनी केले होते. या मोहिमेअंतर्गत महाविद्यालयाचा परिसर हा स्वच्छ करण्यात आला.

## Cleanliness Campaign

On 24 September 2021, a cleanliness campaign was conducted by the NCC unit of the college. The principal of the college Dr. Subhash Gavane guided the students for this. And understood the importance of cleanliness. All the cadets of the NCC unit participated in this campaign. This mission was planned by Lt. Sharad Rave. Under this campaign, the premises of the college were cleaned .

# एटीसी कॅम्प

या शैक्षणिक वर्षात सुद्धा कोरोनाचा प्रभाव असल्यामुळे 13 महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल समीर चौधरी व माननीय जिल्हाधिकारी यांच्या आदेशान्वये एनसीसीचे होणारे वार्षिक कॅम्प हे तालुक्या नुसार आयोजित केले होते. यामध्ये 4 ऑक्टोबर ते 10 ऑक्टोबर 2021 या कालावधीत देऊळगाव राजा तालुक्यासाठी व्यंकटेश महाविद्यालय देऊळगाव राजा येथे हा वार्षिक कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पचे नेतृत्व महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांच्याकडे होते. तसेच 12 ऑक्टोबर 2021 ते 18 ऑक्टोबर 2021 या कालावधीत चिखली तालुक्यासाठी चिखलीच्या श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयात हा वार्षिक कॅम्प आयोजित करण्यात आला होता. या कॅम्पचे नेतृत्व सुद्धा महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांनी केले. या कालावधीमध्ये 15 ऑक्टोबर 2021 या दिवशी दसऱ्याचे औचित्य साधून 13 महाराष्ट्र बटालियनच्या शस्त्रांचे पूजन महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांच्या हस्ते करण्यात आले. या कॅम्प मध्ये महाविद्यालयाचे बी व सी सर्टिफिकेटचे सर्व कॅडेट्स सहभागी झाले होते.

# ATC Camp

Due to the impact of corona in this academic year also, the annual camp of NCC was organized according to the talukas on the orders of Colonel Sameer Chaudhary, Commanding Officer of 13 Maharashtra Battalion and Hon'ble Collector. This annual camp was organized at Venkatesh College Deulgaon Raja for Deulgaon Raja Taluka from 4th October to 10th October 2021. The camp was headed by Lt. Sharad Rave, NCC officer of the college. Also this annual camp was organized from 12th October 2021 to 18th October 2021 at Shri Shivaji College of Arts and Science, Chikhli for Chikhli Taluka. The camp was also led by Lt. Sharad Rave, NCC officer of the college. During this period, on the occasion of Dussehra on 15th October 2021, weapons of 13 Maharashtra Battalion were worshiped by Lt. Sharad Rave, NCC officer of the college. All the B and C certificate cadets of the college participated in this camp.













# मिशन कवच कुंडल

दिनांक 30 ऑक्टोबर 2021 रोजी केंद्र सरकारच्या ‘मिशन कवच कुंडल’ या अभियानांतर्गत महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तसेच शासकीय रुग्णालय चिखली यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच 13 महाराष्ट्र बटालियन खामगाव यांचे कमांडिंग ऑफिसर कर्नल समीर चौधरी यांच्या मार्गदर्शनातून हे अभियान महाविद्यालयामध्ये राबवण्यात आले. या अभियानाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे यांनी केले. या अभियाना अंतर्गत एनसीसीच्या सर्व कॅडेट्सने कोविड 19 चे लसीकरण करून घेतले.

# Mission Kavach Kundal

On October 30, 2021, the Mission Kavach Kundal campaign of the Central Government was conducted in the college under the collaboration of NCC unit of the college and Government Hospital Chikhli and under the guidance of Colonel Sameer Chaudhary, Commanding Officer of 13  Maharashtra Battalion Khamgaon. Under this campaign conducted by Gavhane, all the cadets of NCC got vaccinated against covid 19.



# एनसीसी डे(28 Nov.2021)

दिनांक २८ नोव्हेंबर 2021 रोजी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने एनसीसी डे साजरा केला. याप्रसंगी याकार्याक्रामाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे यांनी भूषविले होते.तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री शिवाजी कला व विज्ञान महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट कुमार किरण पडघान हे लाभले होते. या कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटचे एकूण 92 विद्यार्थी सहभागी झाले होते. याप्रसंगी जुनिअर अंडर ऑफिसर जयश्री गुळवे, कॅडेट अंबादास वाघ, रेणुका देशमुख यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट शितल वाघ हिने केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांनी केले.तर आभार प्रदर्शन ज्युनिअर अंडर ऑफिसर जयश्री गुळवे हिने केले.

# NCC Day(28 Nov.2021)

On 28 November 2021 NCC unit of the college celebrated NCC day. On this occasion, Dr. Subhash Gavane, the principal of the college presided over the function. While the chief guide was Lt. Kumar Kiran Padghan, NCC officer of Sri Shivaji College of Arts and Sciences. A total of 92 students of NCC unit of the college participated in these programs. On this occasion, Junior Under Officer Jayashree Gulve, Cadet Ambadas Wagh, Renuka Deshmukh expressed their thoughts. This program was moderated by Cadet Shital Wagh. The introduction of this program was done by NCC officer Lt. Sharad Rave. The vote of thanks was given by Junior Under Officer Jayashree Gulve. occasion, Cadet Shital Wahkah coordinated the program, NCC Officer Lt. Sharad Rave introduced the program and vote of thanks was given by Junior Under Officer Jayashree Gulve.



# सीडीएस मेजर जनरल बिपिन रावत यांना श्रद्धांजली

भारताचे पहिले सीडीएस मेजर जनरल बिपिन रावत यांचे 8 डिसेंबर 2021 रोजी अपघाती निधन झाले. या दुःखद घटनेनंतर 10 डिसेंबर 2021 रोजी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिट तर्फे सीडीएस मेजर जनरल बिपिन रावत यांना श्रद्धांजली देण्यासाठी कार्यक्रम ठेवण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य सुभाष गव्हाणे, सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच महाविद्यालयाचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते, या कार्यक्रमाची विस्तृत माहिती लेफ्टनंट शरद रावे यांनी दिली. व त्यानंतर मेजर जनरल बिपिन रावत यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# Tribute to CDS Major General Bipin Rawat

India's first CDS Major General Bipin Rawat passed away accidentally on 8 December 2021. After this tragic incident on 10 December 2021, a program was organized by NCC unit of the college to pay tribute to CDS Major General Bipin Rawat. Principal of the college Subhash Gavane, all the faculty members, non-teaching staff and all the students of the college participated in this program. Lt. Sharad Rave gave detailed information about the program. And then a tribute was paid to Major General Bipin Rawat.



# स्वच्छता अभियान रॅली तसेच स्वच्छता अभियानाचे आयोजन

दिनांक 17 डिसेंबर 2021 रोजी 13 महाराष्ट्र बटालियन व महाविद्यालयाचे एनसीसी युनिट तसेच एनएसएस युनिट यांच्या संयुक्त विद्यमानाने स्वच्छता अभियान रॅली व स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात एनसीसी व एनएसएसचे सर्व विद्यार्थी सहभागी झाले होते. या अभियानात महाविद्यालयातील परिसर तसेच महाविद्यालयाच्या बाहेरच्या परिसराचे स्वच्छता करण्यात आली. तसेच रॅलीच्या माध्यमातून स्वच्छतेचे महत्व सामान्य जनतेला पटवून देण्यात आले. ही रॅली महाविद्यालयातून निघून बैल जोडी चौक, राजा टावर, वाटिका या मार्गाने जाऊन तिचे समापन हे शेवटी महाविद्यालयात करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे नियोजन महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांनी केले. तसेच या कार्यक्रमाची सांगता ही एनएसएस चे प्रमुख प्राध्यापक डॉक्टर सुभाष राऊत व प्राध्यापक विजय वाकोडे यांनी केली.

## Swachhta Abhiyan Rally and Swachhath Abhiyan

Cleanliness Abhiyan Rally and organization of Swachhta Abhiyan

s On 17th December 2021, Swachhta Abhiyan Rally and Swachhta Abhiyan was organized under the joint presence of 13 Maharashtra Battalion and College's NCC Unit and NSS Unit. All the students of NCC and NSS participated in this campaign. In this campaign, the premises of the college as well as the premises outside the college were cleaned. Also, the importance of cleanliness was convinced to the general public through the rally. The rally started from the college and went through Bailjodi Chowk, Raja Tower, Vatika and finally concluded at the college. On this occasion, Dr. Subhash Gavane, Principal of the college guided all the students. The program was planned by Lt. Sharad Rave, NCC officer of the college. The program was also concluded by Dr. Subhash Raut, Principal Professor of NSS and Professor Vijay Wakode.






# आर्मी अटॅचमेंट कॅम्प अहमदनगर

दिनांक 19 एप्रिल 2022 ते दिनांक 3 मे 2022 या कालावधीत एनसीसी मधील कठीण मानला जाणारा आर्मी अटॅचमेंट कॅम्प हा अहमदनगर येथे आयोजित करण्यात आला. 13 महाराष्ट्र बटालियन खामगाव यांच्या मार्गदर्शनातून महाविद्यालयाचे 08 विद्यार्थी या कॅम्पमध्ये सहभागी झाले होते. या कॅमचे वैशिष्ट्य म्हणजे हा कॅम्प जिथे आर्मीचे ट्रेनिंग चालते अशा ट्रेनिंग सेंटरमध्ये आयोजित केल्या जातो. व यादरम्यान एनसीसी चे कॅडेट आर्मी ट्रेनिंग बाबत माहिती मिळवतात. या कॅम्प साठी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष माननीय रामकृष्ण दादा शेटे व संस्थेचे सचिव माननीय प्रेमराजजी भाला , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष गव्हाणे तसेच महाविद्यालयाचे एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट शरद रावे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# Army Attachment Camp Ahmednagar

Army Attachment Camp considered tough in NCC was held at Ahmednagar from 19th April 2022 to 3rd May 2022. 08 students of the college participated in this camp under the guidance of 13 Maharashtra Battalion Khamgaon. The specialty of this camp is that the camp is held in a training center where army training takes place. And in the meantime NCC cadets get information about army training. Honorable Ramakrishna Dada Shete, President of Shikshan Prasarak Mandal and Premrajji Bhala, Secretary of the organization, Dr. Subhash Gavhane, Principal of the college and Lt. Sharad Rave, NCC Officer of the college congratulated the students for this camp.

